महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक:२ अ/एडीएम/Maritime Summit/ २०२१/ ९२ दिनांक : 17 FEB 2021

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय, शासन अनुदानीत,

विनाअनुदानीत अभियांत्रिकी पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : Maritime India Summit २०२१ या शिखर परिषदेत सहभागी होणेबाबत...

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्रालय,नवी दिल्ली यांचे वतीने Maritime India Summit २०२१ ही शिखर परिषद २ ते ४ मार्च २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ व प्रख्यात धोरण नियोजक, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार, भारतीय व जागतिक समुद्री कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उद्योग तज्ज्ञ, विचार नेते, तंत्रज्ञान प्रदाते, बँकर्स व विमा कंपन्या, प्रमुख बंदरांचे प्रतिनिधी व प्रमुख बंदरे यांच्यासह जगभरातून सागरी क्षेत्रातील विविध भागधारक सहभागी होणार आहेत.

सदर शिखर परिषदेत जहाज निर्माण, जहाज दुरुस्ती, जहाज पुनर्वापर, ड्रेजर / बार्ज मॅन्युफॅक्चरिंग, नवीन बंदरांची उभारणी आणि विद्यमान बंदरांची क्षमता वाढविणे, बंदर आधारित औद्योगिक विकास, बंदर आधारित स्मार्ट शहरे, विकास यासह भारतातील सागरी क्षेत्रात गुंतवणूकीच्या संधींवरील विशेष सत्र, सागरी क्लस्टर, अंतर्देशीय कनेक्टिव्हिटी प्रकल्प, मल्टि मोडल लॉजिस्टिक हब, मालवाहक व प्रवासी वाहतुकीसाठी अंतर्देशीय जलमार्गाचा विकास, किना-यावरील नौवहन, प्रवासी फेरी सेवा, दीपगृह व जलपर्यटन पर्यटन, बेट विकास व जलचर स्त्रोत, बंदरांमध्ये नूतनीकरणयोग्य उर्जा प्रकल्प आणि इतर सेवा ( वित्तपुरवठा, कायदेशीर, डिझाइन इ.) अशा विविध विषयांची माहिती उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे दोन दिवसाचे विशेष प्रदर्शन सत्रांसह आभासी प्रदर्शनात नवीन तंत्रज्ञान,उत्पादने आणि सेवा तसेच समुद्री क्षेत्रातील नवीनतम घडामोडींविषयी ज्ञान , व्यवसायाच्या संधींचा शोध घेण्यासाठी आणि जागतिक समुद्री स्पेक्ट्रममधील नवीनतम तंत्रज्ञानाच्या ट्रेंडविषयी माहिती घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

सदर शिखर परिषद ही अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि संबंधित घटकांसाठी अत्यंत उपयुक्त असून या शिखर परिषदेत सहभागी होऊन जागतिक स्तरावरील नवनवीन तंत्रज्ञान उत्पादने आणि सेवा यांची माहिती अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रत्येकासाठी माहितीपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे आपल्या संस्थेतील अभियांत्रिकी पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शिक्षक तसेच विद्यार्थ्यांना या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देऊन ते या आभासी परिषदेत सहभागी होतील यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

उपरोक्त शिखर परिषदेत आभासी पध्दतीने सहभागी होण्यासाठी https://www.maritimeindiasummit.in ही लिंक उपलब्ध आहे. या लिंकवर क्लिक करुन १.Exihibitor २.Visitor पर्याय २ वर क्लिक करा. Organization Name मध्ये आपल्या संस्थेचे नाव टाईप करा तदनंतर वैयक्तिक माहिती भरुन नोंदणी करता येईल. नोंदणी केल्यानंतर या शिखर परिषद आणि त्याच्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती सहभागी होणा-या व्यक्तीच्या ई मेल वर विस्ताराने माहिती उपलब्ध होणार आहे.

( प्रमोद नाईक )

सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

प्रत : माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी पदविका, पदवी आणि पदव्युत्तर संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

२. कार्यासन क्रमांक १०, १९ मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी

C:\Users\Admin\Downloads\Maritime India Summit 2021.docx